शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०६/२०२१

| | | |
|---|---|---|
| श्री.बाहुबली नरसगोंडा पाटील | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. सरस्वती शिंदे शिक्षण संस्था, कोल्हापूर<br>२. डी.डी.शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर<br>अंबाबाई मंदीराजवळ, कोल्हापूर | } | वि.प. |

सरस्वती शिंदे शिक्षण संस्था, कोल्हापूर यांचे डी.डी.शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर यांचेकडील सहयोगी प्राध्यापक श्री.बाहुबली नरसगोंडा पाटील विषय-अर्थशास्त्र यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०९/०८/२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

माझी नेमणूक या महाविद्यालयात दि.२१/०६/१९९३ रोजी झाली. सदर नेमणूकीस विद्यापीठाने नेट/सेट परिक्षा उत्तीर्ण होणेच्या अटीवर चेंजिस इन स्टाफची मान्यता दिली. डिसेंबर १९९५ मध्ये एम.फिल. व जुलै १९९६ मध्ये सेट या परिक्षा उत्तीर्ण झालो. माझ्या एम.फिल पात्रतेच्या आधारे विद्यापीठाने मला चेंजिस इन स्टाफ ची नेट/सेट ची अट काढूण नियमित अशी मान्यता दिली. तथापि कॅसचे सर्व लाभ मला सेटच्या आधारे व सेट उत्तीर्ण दिनांकापासून मिळाले आहेत. सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चिती प्रसंगी सहयोगी प्राध्यापक असा बदल माझ्या पदनामामध्ये झाला. परंतू पदनामातील सदर बदलास अनुसरून महाविद्यालयाने माझी चेंजिस इन स्टाफ मान्यता वेळीस घेतली नाही. परिणामी विद्यापीठाने महाविद्यालयास त्यांच्या दि.०८/०२/२०२१ च्या पत्राने रू.१०००० विलंब दंड आकारला. सदर दंड विद्यापीठाने मला आकारला आहे असे समजून महाविद्यालयाने त्यांच्या दि.११/०२/२०२१ च्या पत्राने सदर दंड रक्कम महाविद्यालयात जमा करणे विषयी मला कळवले. तथापि विद्यापीठाने सदर दंड महाविद्यालयास आकारला असल्याने व माझी चेंजिस इन स्टाफ मान्यता घेण्यास झालेल्या विलंबास मी कोणत्याही प्रकारे जबाबदार नसल्यामुळे विद्यापीठाने महाविद्यालयास आकारलेला दंड मला आकारणे योग्य व न्यायाचे नाही. सबब विद्यापीठाने महाविद्यालयास आकारलेला

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

दंड मला न आकारता माझी सहयोगी प्राध्यापक पदाची चेंजिस इन स्टाफ मान्यता विद्यापीठाकडून मिळवणे विषयीचे आदेश महाविद्यालयास द्यावेत ही विनंती.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. श्री.बी.एन.पाटील हे नियुक्तीवेळी अधिव्याख्याता पदासाठी किमान शैक्षणिक अर्हता धारण करित नव्हते. त्यामुळे त्यांची नेट/सेट पास होण्याच्या अटीवर शिवाजी विद्यापीठाने दि.१२/०७/१९९४ च्या पत्राने (एनबी-३डी) अटीवर मान्यता दिलेली आहे.

२. श्री.बी.एन.पाटील यांनी दि.१९/१२/१९९५ रोजी एम.फिल ही पदवी धारण केली, व लगेचच मे ते जुलै १९९६ मध्ये सेट परिक्षाही उत्तीर्ण झाले. त्या अनुषंगाने त्यांनी एम.फिल व सेट परिक्षा पास झाल्यानंतर आपल्या धारण केलेल्या पदव्यासह 'चेंजिस इन स्टाफ' प्रस्ताव मान्यतेसाठी महाविद्यालयाकडे सादर केला. सदर श्री.बी.एन.पाटील यांच्या 'चेंजिस इन स्टाफ' प्रस्तावातील मागणी प्रमाणे व त्यांनी सादर केलेल्या शैक्षणिक पात्रतेच्या कागदपत्रांच्या अनुषांने, छाननी करून महाविद्यालयाने श्री.बी.एन. पाटील यांचा 'चेंजिस इन स्टाफ' प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर केला. व विद्यापीठाने श्री.बी.एन.पाटील यांना संदर्भ क्र.ॲफि.टी.३/एसएसव्ही/एफ १७८/२०९२ दि.११/०६/२०१२ ने Approval for the Changes in-Staff and change of Designation of the Teachers म्हणून मान्यता दिली.

३. श्री.बी.एन.पाटील हे एम.फिल. पदवी धारक व सेट पदवी धारक आहेत. विद्यापीठाने श्री.बी.एन. पाटील यांना दि.११/०६/२०१२ च्या पत्राने एम.फिल.पदवीवर कॅस लाभ मंजूर केले. परंतू शासन स्तरावर श्री.बी.एन.पाटील यांना कॅस लाभ मंजूर करताना मा.विभागीय सह संचालक कार्यालयाकडून सेट परीक्षा पास झालेल्या तारखेपासून कॅस चे लाभ मंजूर करण्यात आलेले आहेत. ही बाब श्री.बी. एन.पाटील यांना अवगत होती आणि आहे. त्यामुळे श्री.बी.एन.पाटील यांनी, त्यांना दि.११/०६/२०१२ ची 'चेंजिस इन स्टाफ' मान्यतेची प्रत मिळाल्यानंतर लगेचच सेट परिक्षा पास झाल्यापासून नियमित मान्यता हवी असे प्राचार्य यांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. परंतू त्यांनी तसे केलेले नाही ही वस्तुस्थिती आहे.

४. सध्यस्थितीत श्री.बी.एन.पाटील यांनी एस.यु/संलग्नता/टे-३/एसडीएम/१५४८ दिनांक १५/०६/२०२० अन्वये सेट परिक्षा पास केलेल्या तारखेपासून व सहयोगी प्राध्यापक म्हणून पदनाम बदल करून मिळण्याबद्दल 'चेंजिस इन स्टाफ' मान्यता मिळावी म्हणून प्रस्ताव सादर केलेला आहे. वरील पत्र 'चेंजिस इन स्टाफ' मान्यता घेण्याबद्दल महाविद्यालयाने शिक्षकांच्या निर्दशनास आणावे असे

निर्देश विद्यापीठाने दिले आहेत. त्यामुळे महाविद्यालयाने वरील संदर्भीय पत्रासह नोटीस काढून सदर बाब महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना निदर्शनास आणून दिली होती. सदर विद्यापीठाच्या पत्राच्या अनुषंगाने श्री.बी.एन.पाटील यांनी आपला 'चेंजिस इन स्टाफ' प्रस्ताव मान्यतेसाठी महाविद्यालयाकडे सादर केला आहे. प्रशासकीय पातळीवर श्री.बी.एन.पाटील यांचा सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवला हे पाटील यांचे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नाही. महाविद्यालयाने विद्यापीठाकडे रीतसर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केल्यानंतर विद्यापीठाने श्री.बी.एन.पाटील यांना, या प्रस्तावावर मान्यता देण्यासाठी एसयु/संलग्नता/टी-३ /एसडीजी/ ३९/३०७६ दि.०८/०२/२०२१ अन्वये रू.१००००/- दंड आकारला आहे. श्री.बी.एन. पाटील यांनी आपल्या दि.१७/०२/२०२१ च्या पत्रात महाविद्यालयाने दंड आकारला आहे असे, म्हणणे सादर केलेले आहे. हे पूर्णपणे चुकीचे आहे. श्री.बी.एन.पाटील यांना याबद्दल महाविद्यालयाने कोणताही दंड आकारलेला नाही. सदरचा दंड हा विद्यापीठाने आकारला आहे. महाविद्यालयाला असा दंड आकारण्याचा कोणताही अधिकार नाही. महाविद्यालयाने विद्यापीठ पत्र क्रं.एसयु/ॲफि/टी-३ एसडीएम/१५४८ अन्वये श्री.बी.एन.पाटील रू.१०००/- फी सह सादर केलेला प्रस्ताव विद्यापीठाकडे रीतसर सादर केला आहे. त्यामुळे श्री.बी.एन.पाटील यांनी आपल्या दि.१७/०२/२१ ने दिलेले निवेदन वस्तुस्थितीच्या विसंगत असून त्यांनी केलेल्या आरोपात कोणतेही तथ्य नाही. याबद्दल श्री.बी.एन.पाटील यांना कळविले आहे.

५. विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांशी पत्रव्यवहार हा महाविद्यालयामार्फत करित असते. विद्यापीठ वैयक्तिक पातळीवर महाविद्यालयाच्या कर्मचा-यांशी पत्रव्यवहार करीत नाही. या प्रकरणामध्येही विद्यापीठाने 'चेंजिस इन स्टाफ'बद्दलचा पत्रव्यवहार श्री.बी.एन.पाटील यांच्याशी महाविद्यालयामार्फत केला आहे.

६. श्री.बी.एन.पाटील यांनी महाविद्यालयाने दंड आकारला आहे असे, म्हणणे सादर केलेले आहे. हे पूर्णपणे चुकीचे व वस्तुस्थितीला विपर्याय करणारे आहे. श्री.बी.एन.पाटील हे शिक्षण क्षेत्रात गेली २८ वर्षे कार्यरत आहेत. व सहयोगी प्राध्यापक म्हणून या महाविद्यालयातील सध्या कार्यरत आहेत. इतक्या अनुभवी व्यक्तिने 'चेंजिस इन स्टाफ' मान्यतेबद्दल वस्तुस्थितीचे अवलोकन चुकीच्या पध्द्तीने करून सर्व प्रकरणाची इत्यंभुत माहिती असताना आपण कार्यरत असणाऱ्या महाविद्यालयाच्या प्रशासनावर व प्राचार्यांवर चुकीच्या पध्दतीने गंभीर आरोप करणे हे संयुक्तिक नाही.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार यांची तक्रार विचारपूर्वक वाचली असता समितीच्या असे निदर्शनास येते कि, तक्रारदार यांनी सेट परिक्षा उत्तीर्ण होऊन त्यांना त्यानुसार सहयोगी प्राध्यापक पद मिळून सेट पास दि.जुलै

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

१९९६ पासून कॅसचे फायदे मिळाले आहेत. तथापि त्यांची चेजिंस इन स्टाफची मान्यता घेतलीची दिसून येत नाही. तक्रारीच्या पृष्ठार्थ तक्रारदार यांनी आवश्यक कागदपत्रे जोडलेली दिसून येतात. परंतु सहाव्या वेतन आयोगापासून त्यांच्या पदनामात बदल झालेनंतर त्यांनी महाविद्यालयास त्यांच्या चेजिंस इन स्टाफ प्रस्ताव द्यावयाचा असलेबाबत महाविद्यालयास कळविलेचे कागदपत्रे सोबत जोडलेली नाहीत. किंवा तक्रारदार यांचे असेही म्हणणे नाही कि, त्यांनी महाविद्यालयास चेजिंस इन स्टाफची मान्यता घेणे करिता योग्य ती कागदपत्रे महाविदयालयास वेळेत सादर केली होती परंतू महाविद्यालयाने ती विद्यापीठास सादर करणेकरिता दिरंगाई केली आहे.

याबाबत महाविद्यालयाकडून दिलेल्या खुलाश्यामध्ये तक्रारदार यांनी एस.यु/संलग्नता/टे ३/एसडीएम/१५४८ दिनांक १५/०६/२०२० अन्वये सेट परिक्षा पास केलेल्या तारखेपासून सहयोगी प्राध्यापक म्हणून पदनाम बदल करून मिळण्याबददल चेंजिस इन स्टाफ मान्यता मिळावी म्हणून प्रस्ताव सादर केला. त्यानुसार विद्यापीठाच्या पत्राच्या अनुषंगाने श्री.बी.एन.पाटील यांनी आपला चेंजिस इन स्टाफ प्रस्ताव मान्यतेसाठी विद्यापीठाकडे सादर केला आहे. विद्यापीठाने श्री.बी.एन.पाटील यांना या प्रस्तावावर मान्यता देण्यासाठी एसयु/संलग्नता/टी३/एसडीजी/३९/३०७६ दि.०८/०२/२०२१ अन्वये रू.१०,०००/- दंड आकारला आहे. विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांशी पत्रव्यवहार हा महाविद्यालयामार्फत करीत असते. विद्यापीठ वैयक्तिक पातळीवर महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांशी पत्रव्यवहार करीत नाही. या प्रकरणामध्येही विद्यापीठाने चेंजिस इन स्टाफ बद्दलचा पत्रव्यवहार श्री.बी.एन.पाटील यांच्याशी महाविद्यालयामार्फत केला आहे. तसेच प्रशासकीय पातळीवर सदर प्रस्ताव प्रंलबित ठेवला हे तक्रारदार यांचे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नसल्याचे समितीसमोर मांडले. प्रस्तूत प्रकरणात तक्रारदार यांना विद्यपीठाने दि.११/०६/२०१२ पासून कॅसचे लाभ मंजूर केले. परंतू शासन स्तरावर कॅसचे लाभ मंजूर करताना सहसंचालक कार्यालयाकडून तक्रारदार हे सेट परीक्षा पास झाल्यापासून त्यांना कॅसचे लाभ मंजूर केले असल्याचे तसेच सदरची बाब तक्रारदार यांना अवगत होती. त्यामुळे तक्रारदार यांनी त्यांना दि.११/०६/२०१२ ची चेंजिस इन स्टाफ मान्यतेची प्रत मिळाल्यानंतर लगेचच सेट परीक्षा पास झाल्यापासून नियमित मान्यता हवी असे प्राचार्य यांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक होते परंतू त्यांनी तसे केले नसल्याचे समितीसमोर म्हणणे मांडले.

संस्थेच्या म्हणण्याचा विचार करता तक्रारदार यांनीही सन २०१२ पासून महाविद्यालयाकडे याबाबत पाठपूरावा करणे आवश्यक होते. महाविद्यालयातील शिक्षकांची चेंजिस इन स्टाफची मान्यता घेण्याबाबत संलग्नता विभागाकडून या समितीस विद्यापीठाकडून प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकाबाबत माहिती मिळाली. संलग्नता विभागाकडून प्राप्त माहितीनुसार दि.२२/०७/१९९६ रोजीच्या परिपत्रकामध्ये

'महाविद्यालयात शिक्षकांच्या नेमणूका निवड समितीमार्फत झाल्यानंतर त्यांना विद्यापीठाकडून मान्यता दिली जाते व मान्यता दिलेल्या पत्रातील शेवटच्या परिछेदामध्ये शिक्षक हजर झाल्यानंतर तात्काळ त्यांचा चेंजिस-इन-स्टाफ फॉर्म भरून पाठवून त्यास मान्यता घ्यावी असे कळविले जाते. परंतू ब-याच महाविद्यालयाकडून फॉर्म पाठवून मान्यता घेतली जात नाही असे निदर्शनास आले आहे. तेंव्हा शिक्षकांचे फॉर्म योग्य त्या कागदपत्रांसह ज्या त्या वेळीच पाठवून मान्यता घ्यावी असे नमूद केल्याचे दिसते.' उपरोक्त परिपत्रकाव्द्वारे विद्यापीठाकडून चेंजिस इन स्टाफची मान्यता घेणेबाबत वेळोवेळी महाविद्यालयास कळविल्याचे दिसून येते. तसेच दि. १४ सप्टेबंर २००४ च्या परिपत्राकामध्ये खालील मजकूर नमूद आहे. संलग्न महाविद्यालयात रीतसर निवड समिती मार्फत व स्थानिक निवड समिती मार्फत शिक्षकांच्या नेमणूका झाल्यानंतर सदरच्या अहवालांना विद्यापीठाकडून मान्यता दिली जाते. मान्यता मिळालेले शिक्षक हजर होताच त्याची माहिती चेंजिस-इन-स्टाफ फॉर्ममध्ये भरून योग्य ती कागदपत्रे त्याच्या सोबत जोडून अशी प्रकरणे विद्यापीठाकडे पाठवून चेंजिस-इन-स्टाफ फॉर्मला विद्यापीठाची मान्यता घ्यावी असे वारंवार पत्रांव्द्वारे तसेच प्रत्येक निवड समिती अहवाल मान्यता पत्राव्द्वारे कळवूनही अनेक महाविद्यालयांनी अशा नियुक्त्यांना मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही. अशा प्रकरणी प्रत्येक वर्षासाठी रू.१०००/-दंडाची आकारणी करून मान्यतेबाबत कार्यवाही केली जाते. आता दि.०९ जुलै, २००४ च्या विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीपुढे चेंजिस-इन-स्टाफ समितीचा अहवाल विचारार्थ सादर केला असता दि.३० ऑक्टोंबर, २००४ पर्यंत असे फॉमर्स प्रत्येक प्रकरणासाठी रू.१०००/-अशा एकत्रित शुल्कासह स्वीकारण्याचा निर्णय झाला असून ही सवलतीची शेवटची संधी आहे. त्यानुसार दि.३० ऑक्टोंबर,२००४ पर्यंत येणा-या परिपूर्ण फॉर्मला रू.१०००/-नाममात्र भरावे लागतील. त्यानंतर मात्र पूर्वीप्रमाणे प्रत्येक फॉर्मला प्रत्येक वर्षाला रू.१०००/- दंड आकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी. तरी आपल्या महाविद्यालयातील ज्या शिक्षकांचे अद्याप चेंजिस-इन-स्टाफ फॉर्म पाठवून मान्यता घेतली नसेल त्यांचे फॉर्म परिपूर्ण माहितीसह व योग्य त्या कागदपत्रांसह पाठवून द्यावेत. प्रस्तावासोबत रू.१०००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या नावे काढून तो जोडणे आवश्यक आहे. या बाबतीत जर पूतर्ता करण्यात आली नाही तर संबधित प्राचार्य त्यासाठी जबाबदार राहतील, याचीही संबधितांनी कृपया नोंद घ्यावी.'

उपरोक्त परिपत्रकामधील मजकूर अवलोकनी घेता महाविद्यालयीन शिक्षकांचे चेंजिस इन स्टाफ फॉर्म पाठवून मान्यता घेण्याची जबाबदारी संबधित प्राचार्यांची असल्याचे समितीच्या निदर्शनास येते. तसेच विद्यापीठाने महाविद्यालयावर बसविलेला दंड तक्रारदाराकडून कोणत्या प्रावधाना अंतर्गत वसूल करण्याचा आदेश काढण्यात आला याचे स्पष्टीकरण महाविद्यालयाने दिलेले नाही. या प्रकरणी

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

विद्यापीठाने महाविद्यालयास केलेला दंड महाविद्यालयाने तक्रारदार यांचेकडून वसूल न करता सदर दंडाची रक्कम महाविद्यालयाने विद्यापीठाकडे भरून तक्रारदार यांच्या चेंजिस इन स्टाफची मान्यता घेणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. करिता समिती खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

वि.प. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी या आदेशाचे तारखेपासून एक महिन्याच्या आत विद्यापीठाने बसविलेल्या दंडाची रक्कम विद्यापीठाकडे भरून तक्रारदार यांची चेंजिस इन स्टाफ ची मान्यता घेणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

**दिनांक :** 2 6 MAY 2023

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
( डॉ.एस.पी.हंगिरगेकर )

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोळेकर )